# ग्रामविकासाच्या नव्या कल्पना उलगडल्या...

आजवर बाळगलेल्या ग्रामविकासाच्या ढोबळ विचारांना मागे टाकत ॲग्रोवन सरपंच महापरिषदेतून मिळालेल्या नव्या कल्पनांना घेऊन पुढे जाण्याची जिद्द सरपंच व्यक्त केली. राज्यातून आलेल्या युवा सरपंचांमध्ये तर उत्साह शिगेला पोचला होता.

टीम ॲग्रोवन



आळंदी : येथील ॲग्रोवन सरपंच महापरिषदेसाठी उपस्थित सरपंच सभागृहाबाहेर आपली छबी कॅमेऱ्यामध्ये टिपण्यात मग्न होते.

### नवं सारं समजून घेत आहे



विविध चर्चासत्रातून बोललेल्या तज्ज्ञ, अनुभवी सरपंच यांच्यामुळे ग्रामविकासाच्या अनेक कल्पना आमच्यासमोर उलगडल्या. योजना कळल्या. खूप शिकायला आणि नवीन समजून घ्यायला मिळालं. गावाच्या विकासात त्याची आम्हाला मोठी मदत होणार आहे.

**- महादेव कोकाडे,** नवताळा, ता. चिमूर, जि. चंद्रपूर

### ग्रामपंचायतीविषयक शासन निर्णय कळले



ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक नियम, शासनाने नव्याने काढलेले अनेक जीआर यांची माहिती मिळाली. मला प्रामुख्याने जलसंधारण, जलयुक्तशिवार यांसारख्या योजनांविषयी जाणून घ्यायचे होते. ती माहिती चांगल्या पद्धतीने मिळाली.

**-किरण कदम,** पिंपळगाव, ता. नायगाव, जि. नांदेड

### अनेकांचे अनुभव ठरतील उपयुक्त



गावाच्या विकासासाठी नियोजनबद्ध काम करण्याची आवश्यकता असते. त्यासाठी सरपंचाना अशाच प्रशिक्षणाची गरज होती. अनेक योजना माहित असून, त्या राबविण्यामध्ये अनेक अडचणी येतात. त्यावर कशी मात करता येते, हे अनेकांच्या अनुभवातून आमच्यासमोर उलगडले.

**- रेखा रामचंद्र घावरे,** शिरसिंगी, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

### महापरिषद ही सरपंच, शासनातील दुवा ठरेल



गावपातळीवरील समस्या फारच वेगळ्या असतात. अर्थात, त्या आमच्यासाठी नवीन नव्हत्या. आमच्या पातळीवर सोडविण्यासाठी आम्ही सक्षम असलो, तरी त्या अधिक चांगल्या पद्धतीने कशा सोडविता येतील, याविषयी समजले. शासन आणि आमच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून ही महापरिषद महत्त्वाची वाटते.

**- अमोल डकले,** गेवराईगुंगी, ता. फुलंब्री, जि. बीड

### विचारात बदल घडवून आणला



आमच्या गावच्या विकासासाठी महापरिषदेतील अनुभव आणि मार्गदर्शन मौलिक ठरणार आहेत. गावच्या सर्वांगीण विकासासाठी तज्ज्ञांचा अनुभव महत्त्वाचा असतो, तोच इथे आम्हाला मिळाला. आमच्या विचारात मोठा बदल या महापरिषदेने घडला.

**-संगीता विजय पोटफोडे,** अमरापूर, ता. शेवगाव, जि. नगर

### नेमक्या मार्गदर्शनामुळे वाढला उत्साह



ग्रामपंचायतीमध्ये सरपंचांची कर्तव्ये आणि जबाबदारी सर्वांत मोठी आहे. मात्र नेमक्या मार्गदर्शनाअभावी बऱ्याचदा विकासकामात अडथळे येतात. या महापरिषदेमुळे आम्हाला कामाची प्रेरणा मिळाली. उत्साह वाढला.

**- शिरीष जाधव,** पाथरी, ता. जि. जळगाव

### गावाचा विकास हेच आमचे कार्य



आमच्या गावाने विकासाकडे वाटचाल सुरू केली आहे. त्यामध्ये या परिषदेतील अनुभव फायद्याचे ठरणार आहे. मी येथे शिकण्याच्या उद्देशाने आले होते. अनेक योजना समजल्या. त्याविषयी सविस्तर जाणून घेत त्या राबविण्याचा प्रयत्न करणार आहे. गावाचा विकासाला बळ मिळेल.

**- वंदना कांबळे,** नवे धानवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

### सुशिक्षित सरपंच सहभागी



महापरिषदेत सुशिक्षित सरपंच सहभागी झाले असून, गावाच्या परिवर्तनासाठी त्याचीच मोठी आवश्यकता आहे. यामध्ये विविध तज्ज्ञांनी केलेले मार्गदर्शन हे आमच्यासारख्या महिला सरपंचांसाठी प्रेरक ठरले. असेच कार्यक्रम राबविल्यास त्याचा ग्रामविकासाला फायदा होईल.

**- वर्षा तावरे,** सांगवी, ता. बारामती, जि. पुणे

### खूप काही शिकण्यासारखे



मुख्यमंत्र्यासह विविध वक्त्यांच्या भाषणातून चांगले मार्गदर्शन मिळाले. या महापरिषदेतून आम्हाला खूप काही शिकण्यासारखे आहे. त्याचा फायदा गावातील विकासकामे करताना होईल. मी ॲग्रोवनचा नियमित वाचक असून, गावांच्या विकासासाठी सातत्याने राबवत असलेल्या कार्यक्रमांचा फायदा होतो.

**- मनोहर पाटील,** मोहिदे, ता. चोपडा, जि. जळगाव

### राज्यातील सरपंचाबरोबर चर्चा झाली



राज्यस्तरीय महापरिषदेमध्ये सर्व भागांतील सरपंचाची चर्चा झाली. परिषदेतील विविध चर्चासत्रे आमच्यासाठी महत्त्वाची होती. त्यातून सर्वांगीण विकासाची कल्पना समजली. आजवर केवळ रस्ते, नाले म्हणजेच विकास ही गावकऱ्यांचीही कल्पना बदलण्यासाठी प्रयत्न करेन.

**- शेषराव तुळनकर,** बर्फा, ता. समुद्रपूर, जि. वर्धा

### जिल्हा पातळीवरही असा उपक्रम हवा



शासनाच्या योजना ॲग्रोवनच्या माध्यमातून समजतात. या महापरिषदेतून आम्हाला माहिती नसलेल्या अनेक योजनांची सविस्तर माहिती मिळाली. प्रदर्शनातून काही पुस्तकांची खरेदी केली आहे. असाच एखादा उपक्रम जिल्हा पातळीवरही होण्याची आवश्यकता आहे.

**- संजय आंधळे,** रुई, ता. वडवणी, बीड

## युवा सरपंचाना मार्गदर्शनाची खरी गरज



गावाचा कारभार हाकताना अनेक अडचणी येत असतात. त्यावर मात कशी करावी, कोणत्या योजना कशाप्रकारे राबवाव्यात, याची उत्तम माहिती या महापरिषदेतून मिळाली. आमच्यासारख्या युवा सरपंचांना असलेली मार्गदर्शनाची खरी गरज ओळखून राबविलेल्या महापरिषदेबद्दल ‘ॲग्रोवन’चे आभार. या महापरिषदेतून एक प्रेरणा, नवी ऊर्जा मिळाली.

**-लोमेश बापूजी गेडाम,** हळदीमाल, ता. तामोर्शी, जि. गडचिरोली

## १४ व्या वित्त आयोगाची माहिती मिळाली



शिक्षण, आरोग्य, शेतीविषयक विविध योजनांची माहिती आम्हाला प्रदर्शनातून मिळाली, विशेषतः १४ व्या वित्त आयोगाची माहितीही त्यातून मिळाली. या आयोगाविषयी बरीचशी माहिती आम्हाला नव्हती, पण सरपंचांना या आयोगाने ताकद दिल्याचे दिसून आले.

**-भारत गायकवाड,** उजनी, अंबाजोगाई, जि. बीड

### विकासकामांसाठी दिशा मिळाली



गावात योजना राबविताना अनेक अडचणी येतात. पोपटराव पवार, जयंत पाटील यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे विकासकामे करण्यासाठी एक दिशा मिळाली. गावात पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छतेच्या योजना राबविणार आहे.

**- सिंधू देविदास उंदरे,** नवीन चांदवड, ता. नेवासा, जि. नगर

### चौदाव्या वित्त आयोगाची माहिती मिळाली



चौदाव्या वित्त आयोगासंबंधी सविस्तर माहिती मिळाली. गावात जाऊन त्याअंतर्गत येणारा निधीचा उपयोग करण्यासाठी गावकऱ्यांशी चर्चा करणार आहे. त्यातून विकासाला चालना मिळेल.

**- संपत धोंगडे,** कऱ्हेगाव, ता. इगतपुरी, जि. नाशिक

### लोकसहभाग महत्त्वाचा आहे



गावाच्या विकासासाठी लोकसहभाग किती महत्त्वाचा आहे, याची माहिती पोपटराव पवार यांच्याकडून मिळाली. गावातील लोकांना एकत्रित आणून विकास कामे करण्यावर भर राहणार आहे. विशेष म्हणजे गावात आरोग्य, पाणीटंचाई, स्वच्छता, रस्ते या कामांना पहिले प्राधान्य देणार आहे.

**- गोकुळ चौधरी,** तळेगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक

### ऊर्जा मिळाली



वक्त्यांच्या मागदर्शनातून एक ऊर्जा मिळाली. गावाचा विकास करणे हे सरपंचाचे कर्तव्य आहेच. परंतु त्याला योग्य दिशा देण्याचे काम या महापरिषदेतून झाले असे म्हणावे लागेल.

**- सुभाष जाधव,** काशीळ, ता.जि. सातारा

### संवादाचे नवे साधन मिळाले



मुख्यमंत्र्यांच्या भाषणातून विविध योजनांची माहिती मिळाली. अस्मिता योजना, कौशल्य आधारित योजनांचा आमच्या गावांना उपयोग होऊ शकतो. माहितीची देवाणघेवाण झाली. या सरपंच महापरिषदेच्या निमित्ताने आम्हाला संवादाचे नवे साधन मिळाले.

**- सीमा लिंभोरे,** आसखेड, ता. खेड, जि. पुणे

### ग्रामविकासाची गंगा वाहते आहे



गावात सुधारणा राबविण्यासाठी उत्सुक, तरुण सरपंच या ठिकाणी जमले आहे. त्यातून ग्रामविकासाची नवी गंगा या निमित्ताने निर्माण होईल. परिषदेत सहभागी वक्त्यांनी अनेक माहीत नसलेल्या गोष्टींचा ऊहापोह केला. त्याचा लाभ आम्हाला गावचा कारभार करताना नक्कीच होऊ शकेल.

**- मंदा पांगरे,** पांगारी, ता. पाचगणी, जि. सातारा.